# जिवन प्राधिकरण विभाग

## १.सीआर/११८/नाशिक/२०१५

तक्रारदार हे उपविभागीय अभियंता कार्यालय, जिवन प्राधिकारण जलव्यवस्थापन उपविभाग, मालेगांव यांचे कार्यक्षेत्रात जलसेवक म्हणून नोकरीस आहेत. त्यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील ग्राहकांकडून दिनांक १३.८. २०१२ ते २१.३.२०१४ या कालावधीतील वसूल रक्कम  दिनांक २०. १.२०१५ पावेतो उपविभागीय कार्यालयांत जमा न केल्यामुळे त्यांचे माहे जानेवारी २०१५ चे वेतन व भत्याचे रु.२०,४२२/— बिल अनामत खाती उपविभागीय स्तरावर राखुन ठेवण्यांत आलेले आहे त्याबाबत तक्रारदारास आलोसे सुनिलराव सुधाकरराव खोपेकर उपविभागीय अभियंता, वर्ग १ जिवन प्राधिकारण जलव्यवस्थापन उपविभाग, मालेगांव यांनी दिनांक २०.१.२०१५ रोजी नोटीस दिलेली होती. सदर नोंटीस रद्य करुन त्यांचे माहे जानेवारी २०१५ चे वेतन व भत्याची रक्कम मंजूर करुन ती रक्कम त्यांचे बॅंक खात्यात त्यांचे नांवे जमा करण्यासाठी आलोसे  यांनी तक्रारदार यांचेकडे रु.१०,०००/— लाचेची मागणी करुन स्विकारले.

याबाबत आरोपी लोकसेवक खोपेकर यांचेविरुध्द मालेगांव छावणी पोलीस ठाणे गुरनं. ३००४/२०१५ , भ्र टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड,)सह १३(२प्रमाणे दिनांक ५. २.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यांत आलेली आहे.